# प्रेसनोट

दिनांक २९/०१/२०२१

**आरोपी लोकसेवक रियाज फारुखमियाँ देशमुख वय ३४ वर्षे, व्यवसाय शासकीय नोकरी, पद – पोलीस शिपाई ब.नं. १४३५, वर्ग–३ नेमणुक पोलीस स्टेशन अहमदपुर रा. संजिवनी शाळेच्या बाजुला चापोली हा.मु. आझाद चौक, अहमदपुर जि. लातूर यांनी खाजगी इसम असलम व वैभव वेल्लुरे यांचे मार्फतीने २,०००/– रुपयांची लाच स्विकारली म्हणुन गुन्हा दाखल.**

यातील तक्रारदार यांचे भाग्यनगर अहमदपुर येथे हामणे किराणा स्टोअर्स नावाचे किराणा दुकान असुन त्यामध्ये किरकोळ किराणा मालाची विक्री करतो. देशमुख हे चार दिवसापुर्वी तक्रारदार यांचे किराणा दुकानी येवुन तु किराणा दुकानामध्ये अवैधरित्य गुटाखा विक्री करत आहेस. पण किराणा दुकानामध्ये अवैध गुटखा विक्रीचा धंदा चालु ठेवण्यासाठी व तक्रारदार यांचेवर कार्यवाही न करणेसाठी प्रत्येक महिण्याला ५,०००/–रुपये दयावे लागतील. पैसे दिले नाहीतर कार्यवाही करीन असे सांगुन तु काय कर माझा एक वैभव नावाचा माणुस आहे. तु त्याला भेट असे सांगितले याबाबतची तक्रार दिनांक २७/०१/२०२१ रोजी प्राप्त झाली होती.

तक्रारदार यांचे तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर यांच्याकडून दिनांक २८/०१/२०२१ रोजी पंचासमक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, पडताळणी दरम्यान **खाजगी इसम वैभव माधव बल्लुरे यांनी पोलीस देशमुख यांच्या सांगण्यावरुन तक्रारदार यांचे किराणा दुकानामध्ये अवैधरित्या गुटख्याची विक्री चालु ठेवण्यासाठी पोलीस शिपाई रियाज देशमुख यांना ३,०००/–रुपये दे असे म्हणुन लाचेची मागणी करुन देण्यास सांगितले. तसेच आरोपी लोकसेवक रियाज फारुखमियाँ देशमुख, पोलीस शिपाई यांनी तक्रारदार यांचे किराणा दुकानामध्ये अवैधरित्या गुटख्याचा धंदा चालु ठेवण्यासाठी व कार्यवाही न करणेसाठी मोबाईलवर टाईप करुन ५,०००/–रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती २,०००/–रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम खाजगी इसम असलम यांचेकडे देण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले.**

**त्याप्रमाणे असलम मौलीसाब तांबोळी वय ३० वर्षे, व्यवसाय पान मटेरिअल, रा. दर्गापुरा गल्ली, अहमदपुर यांनी पोलीस शिपाई रियाज देशमुख यांचे करीता दिनांक २९/०१/२०२१ रोजी २,०००/–रुपये लाचेची रक्कम १५.५७ वाजता पंचासमक्ष दस्तगीर गल्ली अहमदपुर येथील त्यांचे पान मटेरिअलच्या दुकानामध्ये स्वतः स्विकारली आहे.** म्हणुन त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

म्हणून **तक्रारदार यांनी तिघांच्या विरुध्द** पोलीस स्टेशन अहमदपुर येथे कलम ७, ७अ, १२ ला.प्र.का. अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात येत आहे.

गुन्हाचा तपास पोलीस निरीक्षक बाबासाहेब काकडे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर हे करीत आहेत.

सदरची सापळा कार्यवाही श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड, श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक माणीक बेद्रे, पोलीस निरीक्षक बी.एच.काकडे, कुमार दराडे, सपोउपनि संजय पस्तापुरे, पोह/ रमाकांत चाटे, लक्ष्मीकांत देशमुख, चंद्रकांत डांगे, पोना/ मोहन सुरवसे, मपोना/शिवकांता शेळके, संतोष गिरी, शिवशंकर कच्छवे, आशिष क्षीरसागर, अमोल शिंदे, संदीप जाधव, दिपक कलवले, मपोशि रुपाली भोसले, चापोना/राजु महाजन यांनी पार पाडली आहे.

तरी सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारीहे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात मोबाईल फोनवर अधिकारी/कर्मचारी (लोकसेवक) यांचे एसएमएस किंवा व्हिडीओ, ऑडीओ क्लिप असल्यास, भ्रष्टाचार संबंधाने काही माहीती असल्यास किंवा शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी शासकीय निधीचा भ्रष्टाचार केला असेल तर खालील क्रमांकावर संपर्क करावा.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्रीमती कल्पना बारवकर,<br>पोलीस अधीक्षक,ला.प्र.विभाग, नांदेड परिक्षेत्र | :– मोबाईलक्रमांक ८८८८८४१९६५ |
| २) | माणिक बेद्रे, पोलीस उप अधिक्षक | :– मोबाईलक्रमांक ९९२३६६६६४४ |
| ३) | कुमार दराडे पोलीस निरीक्षक | :– मोबाईलक्रमांक ९६५७७०९८४१ |
| ४) | बाबासाहेब काकडे पोलीस निरीक्षक | :– मोबाईलक्रमांक ९०६७२६६२६४ |
| ५) | टोल फ्री हेल्पलाईन क्रमांक | :– १०६४ |
| ६) | कार्यालयाचा फोन क्रमांक | :– ०२४८२–२४२६७४ |
| ७) | Website | :– www.acbmaharashtra.gov.in |
| ८) | Mobile App | :– www.acbmaharashtra.net |
| ९) | Facebook Page | :– www.facebook.com/MaharashtraACB |

पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर